# नियमित दिवाणी दावा क्र. २२३/२०१२ मधील नि. १ वरील आदेश.

(CNR-MHAH230008402014)

माझे पुर्व पिठासिन अधिकारी यांनी नि.क्र. ४४ वर एकूण ७ मुद्दे गठीत केले. त्यापैकी मुद्दा क्र. ५ हा ''प्रतिवादी क्र. २ ने प्रतिवादी क्र. १ कडुन करुन घेतलेले खरेदीखत बेकायदेशीर आहे का ? पोकळीस्त आहे का ?'' अशाप्रकारे गठीत करण्यात आलेला आहे. परंतु, प्रतिवादी क्र.२ ने प्रतिवादी क्र.१ कडुन खरेदीखत करुन घेतल्याचे उभय पक्षकारांचे कथन नसून, प्रतिवादी क्र. १ हिने प्रतिवादी क्र. २ याचेकडुन खरेदीखत करुन घेतल्याचे उभय पक्षकारांचे कथन आहे. त्यामुळे, उभय पक्षकारांच्या कथनावरुन, मुद्दा क्र. ५ हा ''प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. २ कडुन करुन घेतलेले खरेदीखत बेकायदेशीर आहे का ? पोकळीस्त आहे का ?'' अशाप्रकारे गठीत होणे गरजेचे होते. त्यामुळे, उभय पक्षकारांमधील वादाचे योग्यरित्या निवारण करण्यासाठी तसेच संदिग्धता टाळण्यासाठी, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश १४, नियम ५ अन्वये, मुद्दा क्र. ५ मध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे, नि.क्र. ४४ वरील मुद्दा क्र. ५ मध्ये त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

HAMIDKHA JANIKHA PATHAN
Digitally signed by HAMIDKHA JANIKHA PATHAN
Date: 2024.05.09 11:17:24 +0530

ठिकाण -श्रीगोंदा. **( एच. जे. पठाण )**

दिनांक ०८/०५/२०२४. ३ रे सहदिवाणी न्यायाधीश, व.स्तर श्रीगोंदा,

ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर.